**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ८८/२०१३ मधील नि. ५ खालील आदेश</u>**

CNR No. MHK015-000248-2013

प्रस्तुतचा अर्ज वादीने आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहिताप्रमाणे तुर्तातुर्त मनाई प्रतिवादींचे विरुध्द मागितलेला आहे. प्रतिवादींनी निशाणी १४ ला त्यांचे म्हणणे दाखल केले आहे.

२. मौजे शिरसंगी, ता. आजरा येथिल शेतजमिन गट क्र. ३१५ क्षेत्र हे. ०—५९.८ आर व गट क्र. ३१६ क्षेत्र हे. ०—७८.८ आर ही दावा मिळकत आहेत. (यापुढे वरील मिळकतीस 'दावा मिळकती' असे संबोधण्यात येईल).

३. प्रस्तुत अर्जान्वये वादी कथन करतात की, दावा मिळकत ही खरदी दिनांकापासुन त्यांची वहिवाट आहे. वाद मिळकतमध्ये पुर्वीपासुन वादी हे कुळ म्हणुन कसत होते. वादी क्र. १ चे वडिल दि. २२.५.२०१२ रोजी मयत झालेनंतर वादी हे वाद मिळकतीत मालक म्हणुन कब्जेवहिवाटत आहेत. वाद मिळकतीचे कधीही स्वतंत्र भाग पडलेले नाहीत त्यामुळे मे २०१३ मध्ये प्रतिवादींनी वाद मिळकतीचे भाग पाडुन मिळणेबाबत विचारणा केली असता प्रतिवादीकडुन हरकत अडथळा झालेने दावेस कारण घडले आणि तुर्तातुर्त मनाई मागणेबाबत वादी विचारणा करत आहेत.

४. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी नि. ३१ ला कैफियत दाखल करुन वादीचे तुर्तातुर्त मनाई अर्जास हरकत घेतली आहे. वाद मिळकतीत वादीचे पुर्वहक्कदार कुळ म्हणुन कधीही नव्हते आणि अशा परिस्थितीत वादी यांचेवर इस्टॉपल व रेस ज्युडिकेटाची बाधा रे.क.क्र. ५०/१९८४ मुळे येते.

५. प्रतिवादी क्र. १० ने नि. २९ ला म्हणणे दाखल करुन वादीचे पुर्वहक्कदार पुर्वीपासुन वाद मिळकतीत कुळ नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे वादीचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज खोटा आणि बनावट आहे. वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्ज फेटाळण्यात यावा.

६. वरील तत्थ्यावरुन व कागदपत्रावरुन खालील प्रश्न उपस्थित होतात त्यावरील कारणमिंमांसा दिलेली आहे.

| **<u>प्रश्न</u>** | **<u>उत्तरे</u>** |
|---|---|
| १. वादीं प्रथमदर्शनी केस शाबीत करतात काय ? | नाही. |

| **प्रश्न** | **उत्तरे** |
|---|---|
| २. सोयीचा तुळ वादींचे बाजुने आहे काय ? | नाही. |
| ३. अर्ज नामंजुर झाल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल काय ? | नाही. |
| ४. आदेश काय ? | अर्ज नामंजुर करण्यात येत आहे. |

## कारणे

**प्रश्न क. १ करीता**–

७. वादीने त्याचे हक्कात प्रथमदर्शनी केस आहे असे शाबीत करण्यासाठी नि. ५३ ते नि. ६४ वाद मिळकतीचे सात बारा पत्रक २००५ पासुन पुढील काळाचे दाखल केले आहेत. वादींचे कथनानुसार त्यांचे पुर्वहक्कदार वाद मिळकतीत कुळ म्हणुन वहिवाटीत होते नंतर वाद मिळकत त्यांनी अटी शर्तीची पुर्तता करुन खरेदी केली. अशा परिस्थितीत प्रतिवादींनी प्रस्तुत वादी हे त्यांचे पुर्वहक्कदार शंकर देसाई यांचें वादी क्र. १ हे वारस असल्याबाबत अथवा नसल्याबाबत कोणतेही कथन केले नाही. प्रतिवादींचा आक्षेप वादी हे कुळ नव्हते असा आहे. प्रस्तुत सात बारा पत्रकांचे अवलोकन केले असता वादींचे पुर्वहक्कदार यांचे नांव निदर्शनास येते. सात बारा पत्रक हे सरकारला कर जमा करणेसाठी त्यामधील नोंदी ग्राहय धरल्या जातील असे आहे. कारण प्रस्तुत दावेकामी वादींचे पुर्वहक्कदार व वादी कुळ म्हणुन कब्जेवहिवाटीत नव्हते असे आहे. सबब अभिलेखावरुन व दाखल कागदपत्रावरुन असे निदर्शनास येते की दिवाणी न्यायालयास एखाद्या भुधारकास कुळ म्हणुन घोषित करण्याचा अधिकार नाही. सबब वादी हे त्यांचे हक्कात प्रथमदर्शनी केस शाबीत करु शकले नाहीत. त्यामुळे मी प्रश्न क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**प्रश्न क. २ व ३ करीता**

८. वादीने प्रथमदर्शनी केस शाबीत केली नाही. अशा परिस्थितीमध्ये वादीचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजुर करणे योग्य होणार आहे. कारण सोयीचा तुळ वादीचे बाजुने नाही.

९. प्रथमदर्शनी केस आणि सोयीचा तुळ वादीचे बाजुने नसल्याने तुर्तातुर्त

मनाई नामंजुर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. अशा वरील सर्व कारणांमुळे मी प्रश्न क्र. २ व ३ ची उत्तरे नकारार्थी देत आहे.

**प्रश्न क्र. ४ बाबत**

१०. वादीने तुर्तातुर्त ताकीद अर्जाचे सर्व घटक म्हणजेच प्रथमदर्शनी केस, सोयीचा तुळ कधीही न भरुन येणारे नुकसान पुरावा देवुन शाबीत केलेले नाही. त्यामुळे वादींचा अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे. सबब प्रश्न क्र. ४ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च दावेसमवेत काढणेत येईल.

दिनांक : ०२.०१.२०१८. ( के.के. खोमणे )
आजरा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, आजरा

I affirm that the contents of this PDF file Judgment are same,word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | :A.S. Podjale |
| Court | :Civil Court Jr.Dn.Ajara |
| Date | :02.01.2018 |
| Judgment signed by the Presiding Officer on | :02.01.2018 |
| Judgment uploaded on | :03.01.2018 |